**ठळक बातम्या**

- बिहारमधे सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग
- पाकिस्तानात, सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारांवर गदा आणणाऱ्या घटना दुरुस्ती विरोधात वकिलांचा संप
- छत्तीसगडमधे सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार
- कोलकाता कसोटीत भारताचा दक्षिण आफ्रिकेकडून ३० धावांनी पराभव

**आणि**

- दृष्टिहीन महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर आठ गडी राखून विजय

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड विजयानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं राज्यात सरकार स्थापन करण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. सरकार स्थापनेसाठी राजकीय हालचालींनी वेग घेतला आहे. या घडामोडींबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून :

- **- VC - -**

*(बिहार विधानसभा निवडणुकांमधल्या दणदणीत विजयानंतर केंद्रीय मंत्री आणि लोक जनशक्ती पार्टी (राम विलास) चे अध्यक्ष चिराग पासवान, हिंदुस्थानी अवाम मोर्चाचे अध्यक्ष संतोष सुमन यांच्यासह एनडीएच्या घटक पक्षांच्या नेत्यांनी सत्ता स्थापनेबाबत चर्चा करण्यासाठी काल पाटणा इथं जदयू चे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांची भेट घेतली. जदयू चे कार्यकारी अध्यक्ष संजय झा आणि केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांनीही काल संध्याकाळी नवी दिल्लीत भाजपाचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. आज सकाळी केंद्रीय मंत्री नित्यानंद राय, उप मुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा आणि उपेंद्र कुशवाह यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांची भेट घेतली. तसंच भाजपा प्रदेशाध्यक्ष दिलीप जयस्वाल यांनीही आज संध्याकाळी नितीश कुमार यांची भेट घेतली.*

*उद्या, जदयू विधिमंडळ पक्षाची बैठक होणार असून, यावेळी पक्षाचे अध्यक्ष नितीश कुमार यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली जाईल. त्याआधी आज लोकजनशक्ती पार्टी रामविलासच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी चिराग पासवान यांची तर हिंदुस्तानी आवाम मोर्चाच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी प्रफुल्ल माझी यांची निवड झाली.*

*त्यानंतर एक संयुक्त बैठक आयोजित केली जाईल, यावेळी एनडीएच्या नेत्याची निवड केली जाईल. नवनिर्वाचित नेता आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र राज्यपालांकडे सादर करून सरकार स्थापनेचा दावा करेल. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली उद्या मावळत्या मंत्रिमंडळाची बैठक होईल, यात मंत्रिमंडळ बरखास्तीचा प्रस्ताव मंजूर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नव्या सरकारच्या स्थापनेचा मार्ग मोकळा होईल.)*

**<><><><><>**

महाराष्ट्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महायुतीच्या जागावाटपाचं चित्र येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं बातमीदारांशी बोलत होते. या निवडणुकांच्या जागावाटपाचे निर्णय जिल्हास्तरावर होतात, त्यामुळे काही ठिकाणी महायुती झाली आहे, काही ठिकाणी दोन पक्ष एकत्र आले आहेत, तर काही ठिकाणी कोणत्याही पक्षांमध्ये युती झालेली नाही. यावर चर्चा सुरू आहे, असंही ते म्हणाले. महानगरपालिकांच्या निवडणुकीत मात्र शक्य तिथं युती होईल, असा विश्वास फडनवीस यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

पाकिस्तानात सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारांवर गदा आणणाऱ्या २७व्या घटनादुरुस्तीविरोधात वकिलांनी संप पुकारला आहे. न्यायाधीशांनी देखील आपापल्या पदाचे राजीनामे देऊन निषेध नोंदवावा असं आवाहन त्यांनी केलं आहे. आतापर्यंत पाकिस्तानचे सरन्यायाधीश सईद मन्सूर अली शाह यांच्यासह दोन न्यायाधीशांनी राजीनामा दिला आहे. ही घटनादुरुस्ती म्हणजे संविधान आणि न्यायपालिकेवर हल्ला असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

या घटनादुरुस्तीने संरक्षण दलांचे प्रमुख हे पद आणि नवीन संवैधानिक न्यायालय स्थापन होणार आहे. पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष असिफ अली झरदारी यांनी गेल्या गुरुवारी घटनादुरुस्ती विधेयकावर स्वाक्षरी केली.

<><><><><>

आज राष्ट्रीय पत्रकारिता दिन. १९६६मधे या दिवशी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना झाली होती. वर्तमानपत्रं आणि प्रसारमाध्यमांवर नैतिकदृष्ट्या देखरेख ठेवण्याचं काम ही संस्था करते. पत्रकारितेतल्या उत्कृष्ट कामगिरीसाठीचे राष्ट्रीय पुरस्कार या दिवशी प्रदान करण्यात येतात.

नवी दिल्ली इथं राष्ट्रीय पत्रकारिता दिनानिमित्त आयोजित समारंभाला माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल मुरुगन, उपस्थित राहिले. प्रेस कौन्सिलच्या अध्यक्ष न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यावेळी उपस्थित होत्या. लोकशाहीमध्ये पत्रकारितेची भूमिका महत्त्वाची असल्याचं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले.

आजच्याच दिवशी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियानं पत्रकारितेमध्ये जागल्याची भूमिका घेतली, आणि पत्रकारितेचं स्वातंत्र्य जपणं, आणि भारतीय पत्रकारितेचा दर्जा उंचावणं अशी दुहेरी जबाबदारी स्वीकारली, असं न्यायमूर्ती रंजना देसाई यांनी सांगितलं.

पंढरपूर इथं व्हॉइस ऑफ मीडिया आणि व्ही ओ एम नॅशनल फोरम यांच्या संयुक्त विद्यमानं पत्रकारांसाठी आयोजित कार्यशाळेला राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांनी मार्गदर्शन केलं. समाज सुधारण्याचे कार्य शालेय जीवनापासूनच सुरू केलं पाहिजे, त्यासाठी पत्रकारांनी सक्रिय योगदान द्यावं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

<><><><><>

देशातल्या सकारात्मक घडामोडींनी युवा पिढीमध्ये आशावाद निर्माण केला असून, यात माध्यमांनी महत्वाची भूमिका बजावल्याचं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं 'मनोरमा न्यूजमेकर पुरस्कार २०२४' निमित्त आयोजित समारंभात बोलत होते. पत्रकारिता दुर्बल घटकांचा आवाज जगापर्यंत पोहोचवतो, असं ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात राधाकृष्णन यांनी केंद्रीय पर्यटन तसंच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांना मनोरमा न्यूजमेकर पुरस्कार प्रदान केला.

<><><><><>

लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्बस्फोट प्रकरणात राष्ट्रीय तपास यंत्रणेनं आमीर रशीद अली, या कश्मिरच्या रहिवाश्याला दिल्लीत अटक केली. अमीर यानं, उमर

नबी याच्यासोबतीनं स्फोटाचा कट रचला होता, असं तपास यंत्रणेनं म्हटलं आहे. या स्फोटात वापरलेली गेलेली कारची नोंदणीही अमीर याच्या नावावर होती अशी माहिती तपास यंत्रणेनं दिली आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. यात दोन महिलांचा समावेश आहे. या तिघांवर १५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. तुमालपाड भागातल्या जंगलात नक्षलवाद्यांचा वावर असल्याची खबर मिळाल्यानंतर जिल्हा राखीव दलाच्या एका पथकानं या भागात शोधमोहीम सुरू केली. सुरक्षा दलं आणि नक्षलवाद्यांमध्ये आज सकाळपासून चकमक सुरु होती. चकमकीनंतर या तिघांच्या मृतदेहांबरोबरच एक रायफल, बीजीएल लॉन्चर्स, इतर शस्त्रास्त्रं आणि स्फोटकं सुरक्षा दलांनी हस्तगत केली.

**<><><><><>**

कोलकाता इथं झालेला पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं आज तिसऱ्याच दिवशी भारतावर ३० धावांनी विजय मिळवला, आणि दोन सामन्यांच्या या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

आज दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डाव १५३ धावांत आटोपला.

भारताला दुसऱ्या डावात विजयासाठी १२४ धावा करायच्या होत्या. मात्र भारताचा संपूर्ण संघ केवळ ९३ धावा करून तंबूत परतला.

या सामन्यात आठ बळी घेणारा सायमन हार्मर सामनावीर ठरला.

मालिकेतला दुसरा आणि अखेरचा सामना येत्या २२ तारखेपासून गुवाहाटी इथं होणार आहे.

**<><><><><>**

दृष्टिहीन महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक  स्पर्धेत आज झालेल्या सामन्यात भारतानं पाकिस्तानचा आठ खेळाडू राखून पराभव केला. स्पर्धेतला हा भारताचा सलग पाचवा विजय ठरला.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पाकिस्ताननं, मेहरिन अली हिच्या ६६ धावांच्या खेळीच्या जोरावर सर्वबाद १३५ धावा केल्या. भारतानं पाकिस्तानचे सात खेळाडू धावबाद केले.

त्यानंतर विजयासाठीचं १३६ धावांचं आव्हान भारतानं केवळ १० षटकांत दोन खेळाडूंच्या मोबदल्यात पार केलं. भारताच्या वतीनं अनेखा देवी हीनं सर्वाधिक ६४ धावा केल्या. अनेखा हिलाच सामनावीराच्या किताबानं गौरवलं गेलं.

<><><><><>

श्रवणदोष असलेल्यांसाठीच्या डेफलिंपिक्स २०२५ स्पर्धेत भारताच्या धनुश श्रीकांत यानं एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. जपानमध्ये टोक्यो इथं सुरू असलेल्या या स्पर्धेत त्यानं २५२ पूर्णांक २ दशांश गुण नोंदवत नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. भारताचाच मोहम्मद वनिया यानं २५० पूर्णांक १ दशांश गुण मिळवून रौप्यपदक मिळवलं. महिलांच्या एअर रायफल प्रकारात महित संधू हिनं रौप्य, तर कोमल वाघमारे हिनं कांस्यपदकाची कमाई केली.

<><><><><>

ग्रेटर नॉयडा इथं सुरू असलेल्या जागतिक मुष्टियुद्ध चषक स्पर्धेच्या पहिल्या दिवशी भारताच्या चारही स्पर्धकांनी उपांत्य फेरीत धडक मारली. महिलांच्या ४८ किलो वजनी गटात मीनाक्षी हिनं, तर ५८ किलो वजनी गटात प्रीती यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर सहज मात केली. पुरुषांच्या स्पर्धेत ८० किलो वजनी गटात अंकुश आणि ९० किलो वजनावरच्या गटात नरेंद्र यांनी उत्तम कामगिरी करत उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित केलं.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर आणि कतारचे प्रधानमंत्री आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री मोहम्मद बिन अब्दुल रहमान अल थानी यांच्यात पश्चिम आशियातल्या घडामोडींविषयी तसंच इतर जागतिक मुद्द्यांवर विस्तृत चर्चा झाली. ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक यासह धोरणात्मक विषयावर यावेळी चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी समाधमाध्यमावरल्या पोस्टमधे सांगितलं. जयशंकर यांनी थानी यांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वतीने शुभेच्छा दिल्या आणि दोन्ही देशांमधले परस्पर संबंध अधिक दृढ करण्यासंबंधी भारत वचनबद्ध असल्याचं सांगितलं.

**<><><><><>**

सीमावर्ती भागातल्या पर्यटनाला चालना देण्याच्या दिशेने सुरु असलेल्या प्रयत्नांचा भाग म्हणून, सिक्कीम सरकारने ‘डोकलाम’ आणि ‘चो-ला’ ही धोरणात्मकदृष्ट्या संवेदनशील ठिकाणं पर्यटकांसाठी खुली करण्याचा निर्णय  घेतला आहे. सिक्कीमच्या  पर्यटन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव सी.एस. राव यांनी वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

//<><><><><>//